**जनसंपर्क अधिकारी, पोलीस आयुक्तालय,**
**ठाणे शहर**
इमेल-cp.thane.pro@mahapolice.gov.in
**मो.क्र.9819208279**

**प्रेसनोट** **दिनांक ०७.०१.२०२५**

## “ जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांस शिताफिने अटक ”

दिनांक ०६/०१/२०२५ रोजी विठ्ठलवाडी पो स्टे येथे गुन्हा रजिस्टर नंबर ०८/२०२५ बी एन एस कलम ३०९(६),३५१(३),३(५) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात तक्रारदार श्री.शरद गुलाब सिंग वय ५९ रा. मराठा सेक्शन, उल्हासनगर यांचा दोन अनोळखी इसमांनी पाठलाग करून त्यांचे ताब्यातील तीन लाख रुपये रोख असलेली बॅग त्यांचा गळा दाबुन व मारहाण करून जबरीने चोरुन नेली होती. त्या अनुषंगाने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, श्री.अशोक कोळी, गुन्हे शाखा, युनिट-४ यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक प्रविण खोचरे व पथकातील अंमलदार यांनी त्यांना मिळालेल्या खात्रीशिर बातमी वरून अंबरनाथ येथील म्हाडा कॉलनी येथे इसम नामे १) अक्षय भिमराव चलवादी वय.२३ २) अरबाज अब्दुल सलाम शेख उर्फ पापा वय.२६ रा.बुवापाडा अंबरनाथ यांना संशयावरुन ताब्यात घेवून त्यांची अंगझडती घेतली असता त्यांच्या ताब्यात ४५,६००/-रुपये मिळून आले. त्यावरुन त्यांची सखोल चौकशी केली असता, त्यांनी नमूद गुन्हा केला असल्याचे कबूल केले आहे. सदर दोनही आरोपींना पुढील कारवाईसाठी विठ्ठलवाडी पोलीस स्टेशनच्या ताब्यात देण्यात आले आहे.

सदरची कामगिरी श्री.अमरसिंह जाधव, पोलीस उप आयुक्त, गुन्हे, श्री.शेखर बागडे सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.अशोक कोळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक, गुन्हे शाखा, युनिट-४, उल्हासनगर यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक प्रवीण खोचरे, पोहवा/गावडे, पो हवा/वाघ,पोशि/राजेंद्र थोरवे यांनी केलेली आहे.

( शैलेश साळवी )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक तथा जनसंपर्क
अधिकारी, पोलीस आयुक्तालय,
ठाणे शहर